CIDCO
WE MAKE CITIES



# नवे शहर ❒ शुक्रवार, ३० मे २०२५ ❒

# विमानोड्डाणासाठी नवी मुंबई सज्ज

## नवी मुंबईतून पहिल्या उड्डाणाचा 'इंडिगो'ला मान

**नवी मुंबई :** सिडको महामंडळ आणि अदानी उद्योग समूहाच्या सहकार्यातून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (एनएमआयए) उभारण्याचे काम अखेरच्या टप्प्यात आले आहे. या विमानतळावर भारतीत लढाऊ विमानांची तसेच व्यावसायिक विमानांची चाचणी देखील यशस्वी झाली आहे. त्यातच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाबाबत सर्वात मोठी बातमी समोर आली असून नवी मुंबई विमानतळावरून जून महिन्यापर्यंत पहिले विमान आकाशात झेप घेण्याच्या दृष्टीकोनातून पहिले पाऊल पडले आहे. नवी मुंबईतून पहिले व्यावसायिक उड्डाण 'इंडिगो'चे विमान करणार आहे. या उड्डाणासंदर्भात इंडिगो कंपनी आणि अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड यांच्यात पहिला करार झाला आहे.

या करारानंतर नवी मुंबई विमानतळ लवकरच विमानोड्डाणासाठी सज्ज होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. साधारणत: जून पासून कंपनी 'इंडिगो'ची नवी मुंबई विमानतळावरून १५ हून अधिक शहरांसाठी दररोज १८ उड्डाणे (३६ एअर ट्राफिक मॅनेजमेंट) सुरू होणार आहेत. नोव्हेंबर २०२५ पर्यंत उड्डाणांची संख्या वाढून ७९ दैनंदिन उड्डाणांपर्यंत (१५८ एटीएम) पोहोचेल. यात १४ आंतरराष्ट्रीय उड्डाणांचा देखील समावेश असेल. नोव्हेंबर २०२६ पर्यंत दैनंदिन १४० उड्डाणे होणार असून त्यापैकी ३० आंतरराष्ट्रीय उड्डाणे असतील.

(उर्वरित पान २ वर)

### इंडिगो कंपनी आणि अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज यांच्यात करार

"'एनएमआयए'मधून ऑपरेशन सुरू करणारा इंडिगो पहिला एअरलाईन भागीदार होणार आहे. आमच्यातील भागीदारी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी ट्रान्सफर हब म्हणून 'नवी मुंबई विमानतळ'चे स्थान निश्चित करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. आमचे सहकार्य या प्रदेशासाठी आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रवाशांसाठी 'एनएमआयए'ची विमान वाहतूक प्रवेशद्वार म्हणून भूमिका मजबूत करण्यासाठी सज्ज आहे. 'इंडिगो'सोबत भागीदारी करीत विमानसेवेसाठी करार करून यशस्वी पाऊल टाकले आहे. ''नवी मुंबई विमानतळ'ला एक प्रमुख विमान वाहतूक केंद्र बनविण्याच्या दृष्टीने सदरचा एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.

-अरुण बन्सल, सीईओ-अदानी एअरपोर्ट होल्डींग्ज लि.

"'इंडिगो'च्या माध्यमातून नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीवरून पहिली विमानसेवा सुरू होणार आहे. याचा आम्हाला आनंद होत असून प्रवाशांच्या वाढत्या गरजा त्याबरोबरच भारताच्या विमान वाहतूक क्षेत्राला इंडिगो आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक गतीमान करणार आहे. नवीन 'एनएमआयए'च्या नवीन उड्डाणांमुळे प्रवाशांना अनुभव उंचावेल.

-पीटर एल्बर्स, सीईओ-इंडिगो एअरलाईन्स.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

मुंबई, शुक्रवार, ३० मे २०२५ महामुंबई पुढारी

# नवी मुंबईतून इंडिगोची उड्डाणे जाहीर

**नवी मुंबई : पुढारी डेस्क**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून पहिले विमान ऑगस्टमध्ये उड्डाण घेईल, असे स्पष्ट संकेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असतानाच या विमानतळावरून रोज १८ उड्डाणे करण्याची घोषणा इंडिगो एअरलाईन्सने केली आहे. नवी मुंबईतून उड्डाणे जाहीर करणारी ही पहिली कंपनी ठरली आहे.

इंडिगो एअरलाईन्स आणि अदानी एअरपोर्ट होल्डींग लिमिटेड यांच्यात झालेल्या सामंजस्य करारानुसार नवी मुंबई विमानतळावरून सुरुवातील १८ उड्डाणे दिवसाला होतील आणि १५ शहरांकडे ही विमाने जातील. नंतर ही उड्डाण संख्या ७९ पर्यंत वाढवली जाईल, त्यात नोव्हेंबर २५ पासून सुरू होणाऱ्या १४ आंतरराष्ट्रीय उड्डाणांचाही समावेश असेल. त्यानंतर वर्षभराने म्हणजेच नोव्हेंबर २०२६ पासून ही उड्डाण संख्या १४० वर जाईल.



नवी मुंबई विमानतळाच्या उद्घाटनालाच विमानांचे उड्डाण करणारी इंडिगो ही पहिली एअरलाईन्स ठरणार असल्याचे इंडिगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एलबर्स यांनी सांगितले आहे. तर अदानी एअरपोर्ट होल्डींगचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण बन्सल म्हणाले, इंडिगो आणि अदानीच्या भागिदारीमुळे नवी मुंबई विमानतळ आंतरराष्ट्रीय आणि आंतरदेशीय विमानप्रवास क्षेत्रात आपले भक्कम स्थान निर्माण करेल. आमच्या भागिदारीने नवी मुंबई विमातळाची भूमिकाही भक्कम होईल.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन एप्रिल किंवा मेमध्ये होणे अपेक्षित होते. मात्र, हे उद्घाटन येत्या ऑगस्टमध्ये होईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी एका मुलाखतीत स्पष्ट केले. मेट्रो, लोकल आणि वॉटर टॅक्सीने जोडले गेलेले हे पहिले विमानतळ असेल असे मुख्यमंत्र्यांनी यापूर्वीच जाहीर केले आहे.

उद्घाटन झाल्यानंतर पहिल्या टप्प्यात या विमानतळावरून वर्षाला २० दशलक्ष प्रवासी प्रवास करतील आणि ०.५ मिलियन मेट्रीक टनची वाहतूक होईल. विमानतळाचे काम पूर्ण झाल्यानंतर हीच क्षमता अनुक्रमे ९० दशलक्ष प्रवासी आणि ३.२ मिलियन मेट्रीक टन माल वाहतूक अशी होईल.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

दैनिक **सागर** रायगड
शुक्रवार दि. ३० मे २०२५

# नवी मुंबई विमानतळावरुन इंडिगोची विमानसेवा

- मोदींच्या हस्ते स्वातंत्र्यदिनी उद्घाटन
- एकाचवेळी १५ शहरात विमाने झेपावणार

**नवी मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून व्यावसायिक उड्डाणे सुरु करणारी इंडिगो एअरलाईन्स ही पहिली कंपनी ठरणार आहे. विमानतळाचे उद्घाटन ऑगस्टमध्ये होण्याची शक्यता असून पहिली इंडिगोचीच विमाने उडणार आहेत.

सुरुवातीला रोज १८ विमानांचे टेकऑफ आणि १८ विमानांचे लॅण्डिंग होणार आहे.



नवी मुंबईतून देशातील १५ शहरे हवाईमार्गे जोडली जाणार आहेत. येत्या नोव्हेंबरपर्यंत उड्डाणांची संख्या ७९ पर्यंत वाढणार असून त्यामध्ये १४ आंतरराष्ट्रीय उड्डाणांचा समावेश असेल. या भागीदारीचा करार अदानी एअरपोर्ट होल्डिंग प्रायव्हेट लिमिटेड आणि इंडिगो एअरलाईन्सच्या दरम्यान झाला.

अदानी एअरपोर्ट होल्डिंग प्रायव्हेट लिमिटेड आणि इंडिगो एअरलाईन्सच्यावतीने या भागीदारीची घोषणा करण्यात आली. विमानतळाचे उद्घाटन झाल्यानंतर इंडिगो एअरलाइन्स या नवी मुंबई विमानतळावरून सर्वप्रथम हवाई सेवा सुरु करणार आहे. सुरुवातीला १८ विमानांचे टेकऑफ आणि १८ विमानांचे लॅण्डिंग होणार आहे. त्यानंतर येत्या नोव्हेंबरपर्यंत विमानांचे टेकऑफ आणि लॅण्डिंगची संख्या सुमारे १४०च्या आसपास जाणार आहे. त्यामध्ये ३० आंतरराष्ट्रीय सेवांचाही समावेश असणार आहे. या भागीदारीचा करार ........

▶ वृत्त २ वर

## नवी मुंबई विमानतळावरुन इंडिगोची विमानसेवा

इंडिगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एल्बर्स आणि अदानी एअरपोर्ट होल्डिंगचे सीईओ अरुण बन्सल यांच्या उपस्थितीत करण्यात आला आहे.

### असे असेल विमानतळ

११६० हेक्टर परिसरात उभारण्यात येत आहे. या विमानतळाचा रनवे ३.७ किमी इतका लांब असून या विमातळावर एकाचवेळी ३५० विमाने उभी राहू शकतात. हे विमानतळ पूर्णपणे कार्यन्वित झाल्यानंतर वर्षाला ९ कोटींहून अधिक प्रवासी प्रवास करु शकतात. या विमानतळाचा पंहिला टप्पा एप्रिल २०२५ पर्यंत पूर्ण होईल. त्यानंतर २०२९ पर्यंत दुसरा टप्पा पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तर, तिसरा टप्पा २०३२ पर्यंत आणि चौथा टप्पा २०३६ पर्यंत पूर्ण होईल.

### दोन कोटी प्रवासी हाताळणार

नवी मुंबई विमानतळाचे पहिल्या टप्प्यातील काम सध्या पूर्ण झाले आहे. या पहिल्या टप्प्यात विमानतळाची क्षमता वार्षिक दोन कोटी प्रवासी हाताळण्याची आहे. विमानतळाचे चारही टप्पे पूर्ण झाल्यानंतर प्रवासी हाताळण्याची वार्षिक क्षमता थेट ९ कोटीपर्यंत जाणार आहे. तसेच या विमानतळावरून पहिल्या टप्प्यात ५०० टन मालाची वाहतूक होणार आहे. विमानतळाचा पूर्ण विस्तार झाल्यानंतर मालवाहतुकीची वार्षिक क्षमता ३२ कोटी टनापर्यंत जाणार आहे.

### उड्डाणाची तयारी पूर्ण

१ हजार १६० हेक्टरमध्ये विस्तारलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर पहिल्या टप्प्यातील उड्डाणाची तयारी सध्या पूर्ण करण्यात आली आहे. धावपट्टी, टॅक्सी रनवे यांची कामे पूर्ण झाली आहे. येत्या ७ ऑगस्टपर्यंत विमानतळ टेकऑफ आणि लॅण्डिंगसाठी उपलब्ध नसल्याची नोटीस हवाई प्राधिकरणाने विमान कंपन्या आणि वैमानिकांना दिली आहे. त्यामुळे या विमानतळाचे उद्घाटन ऑगस्टच्या शेवटी किंवा सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात होणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

मुंबई मित्र शुक्रवार, 30 मई 202

# नवी मुंबई एयरपोर्ट से रोजाना इंडिगो की 140 फ्लाइट भरेंगी उड़ान

**मुंबई।** देश के एविएशन सेक्टर को नई ऊंचाई देने के लिए अदाणी एयरपोर्ट्स और इंडिगो एयरलाइंस के बीच एक अहम करार हुआ है। इसके तहत इंडिगो नवी मुंबई इंटरनेशनल एयरपोर्ट (एनएमआईए) से उड़ान भरने वाली पहली एयरलाइन बनेगी। कंपनी ने घोषित किया कि वो नई मुंबई इंटरनेशनल एयरपोर्ट से कमर्शियल फ्लाइट्स की शुरुआत करेगी। इसे ग्लोबल एविएशन में भारत की स्थिति मजबूत करने की दिशा में बड़ा कदम माना जा रहा है। इंडिगो पहले दिन से ही 15 से अधिक शहरों के लिए 18 दैनिक उड़ानें (36 एयर ट्रैफिक मूवमेंट) शुरू करेगी। इसके बाद नवंबर 2025 तक रोजाना फ्लाइट की संख्या बढ़ाकर 79 तक की जाएगी। जिनमें 14 अंतरराष्ट्रीय उड़ानें भी शामिल होंगी। मार्च 2026 तक ये संख्या बढ़कर 100 से अधिक उड़ानें प्रतिदिन हो जाएगी और नवंबर 2026 तक 140 दैनिक उड़ानों तक पहुंचने की योजना है, जिनमें 30 अंतरराष्ट्रीय उड़ानें होंगी। अदाणी एयरपोर्ट्स होल्डिंग लिमिटेड के सीईओ अरुण बंसल ने बताया कि हम इंडिगो को नवी मुंबई इंटरनेशनल एयरपोर्ट से उड़ान भरने वाली पहली एयरलाइन पार्टनर के रूप में घोषित करते हुए बेहद खुश हैं। यह साझेदारी घरेलू



और अंतरराष्ट्रीय यात्रियों के लिए एक ट्रांसफर हब बनाने की दिशा में बड़ा कदम है। हम मिलकर लाखों यात्रियों के लिए यात्रा अनुभव को आसान और बेहतर बनाएंगे। हमारा सहयोग एनएमआईए को क्षेत्रीय ही नहीं, बल्कि राष्ट्रीय और अंतरराष्ट्रीय स्तर पर भी एक अहम एविएशन गेटवे के रूप में मजबूत करेगा। दूसरी ओर इंडिगो के सीईओ पीटर एल्बर्स ने कहा कि इंडिगो नवी मुंबई इंटरनेशनल एयरपोर्ट से उड़ान शुरू करने वाली पहली एयरलाइन होगी और हमें यह ऐलान करते हुए बेहद खुशी हो रही है। यह साझेदारी दिखाती है कि दोनों पक्ष ऑपरेशनल तैयारियों के अगले स्तर के लिए पूरी तरह तैयार हैं। कम कीमत, समय पर सेवा और आसान सफर के साथ ये हमारे यात्रियों को बेहतर यात्रा अनुभव प्रदान करेगी। इस साझेदारी से न केवल एनएमआईए एक प्रमुख एविएशन हब बनेगा, बल्कि भारत को 2030 तक दुनिया की तीसरी सबसे बड़ी विमानन अर्थव्यवस्था बनाने में मदद मिलेगी।

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

नवराष्ट्र | ठाणे, ३० मे २०२५

आता नागरिक पावसाळी कालावधीत २४/७ तत्वावर त्वरित तक्रारी नोंदवू शकणार

# सिडको नियंत्रण कक्ष झाला कार्यान्वित

नवी मुंबई, शहर प्रतिनिधी. सिडको महामंडळाचा आपत्कालीन नियंत्रण कक्ष ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पावसाळी कालावधीमध्ये २४ x ७ तत्त्वावर कार्यान्वित करण्यात आला आहे. दरवर्षी पावसाळी कालावधीमध्ये सिडकोतर्फे नवी मुंबईतील सिडको अधिकार क्षेत्रातील नागरिकांकरिता आपत्कालीन नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात येतो. पावसाळ्याच्या कालावधीमध्ये उद्‌भवणाऱ्या संभाव्य आपत्ती/दुर्घटना लक्षात घेता सिडकोचा सुसज्ज असा आपत्कालीन नियंत्रण कक्ष कार्यरत असतो. सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी, सुरेश मेंगडे यांनी आपत्कालीन नियंत्रण कक्षाच्या तयारीचा व या कक्षाच्या माध्यमातून पार पाडल्या जाणाऱ्या सर्व सेवा व सुविधांचा आढावा घेतला. त्याचप्रमाणे सर्व संबंधित नोडल अधिकाऱ्यांना नागरिकांच्या मान्सून संबंधित तक्रारींचे वेगाने निराकरण करण्याचे आदेश दिले.



## सुट्टीच्या दिवशीही २४ तास कार्यरत

सीबीडी बेलापूर येथील सिडको भवन इमारतीच्या तळ मजल्यावर असलेला हा नियंत्रण कक्ष कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांसह शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही २४ तास कार्यरत राहणार आहे.

## नियंत्रण कक्षाद्वारे होईल त्वरित कार्यवाही000

सिडकोच्या आपत्कालीन नियंत्रण कक्षाद्वारे वृक्षांची पडझड/वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या वृक्षांची छाटणी, रस्त्यावरील उघड्या गटारांची झाकणे पूर्ववत बसवणे, पूर/पूरसदृश परिस्थिती, रस्त्यांवरील खड्डे, रस्ते वा नाल्याजवळ साचलेला कचरा, व्यक्तींचे पाणीसाठ्याच्या ठिकाणी बुडणे, आग व आगीचे विविध प्रकार, साथीचे रोग, विषारी प्राणी चावण्यासंबंधी बाबी, इमारत कोसळणे, भूस्खलन, पाणी साचणे या आपत्तींची दखल घेण्यात येऊन त्याबाबत त्वरित कार्यवाही करण्यात येईल. या कक्षामार्फत आपत्कालीन स्थितीत अभियांत्रिकी विभाग, आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग, सुरक्षा विभाग, उद्यान विभाग आदी महत्त्वाच्या विभागाचे कर्मचारी २४ तास संपर्कात असतील.

## नागरिकांनी पुढील क्रमांकांवर संपर्क साधावा

नागरिकांनी वरीलपैकी कोणतीही आपत्ती उद्भवल्यास पुढे देण्यात आलेल्या दूरध्वनी अथवा व्हॉटसॲप क्रमांकावर किंवा ई-मेलद्वारे सिडको आपत्कालीन नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून आपत्तीसंबंधी माहिती द्यावी किंवा त्याबाबतची तक्रार नोंदवावी.

१) दूरध्वनी क्र. ०२२-६७९१८३८३ / ८३८४ / ८३८५, ०२२-२७५६२९९९
२) व्हॉटसॲप क्र. ८६५५६८३२३८
३) टोल फ्री क्र. १८००२६६४०९८
४) फॅक्स क्र. ०२२-६७९१८१९९
५) ई-मेल eoc@cidcoindia.com

@CIDCO_LTD | @CIDCO_LTD | @cidco_ltd | @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

रायगड टाइम्स ■ शुक्रवार, ३० मे २०२५

# कळंबोली येथे अनधिकृत बांधकामावर धडक मोहीम

। रायगड टाइम्स ।

पनवेल । सिडकोच्या अनधिकृत बांधकाम विभागाने कळंबोली नोड येथे धडक मोहीम राबवत २०० हून अधिक तात्पुरती अतिक्रमणे जमीनदोस्त केली. ही अतिक्रमणे नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या महत्त्वाच्या जलवाहिनीवर आणि मोकळ्या भूखंडावर उभारण्यात आली होती.

कळंबोली सेक्टर-२३ मधील भूखंड क्र. २०६ वरुन नवी मुंबई महापालिकेची २,०४२ मि.मी. व्यासाची मुख्य जलवाहिनी जाते, याच जलवाहिनी लागत आणि आसपासच्या मोकळ्या भूखंडावर २०० पेक्षा अधिक घरे व शेड उभारण्यात आली होती. सिडकोच्या प्रचलित नियमावली आणि धोरणांचे उल्लंघन करुन तसेच कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता ही बांधकामे उभारण्यात आली असल्याने सिडकोच्या अनधिकृत बांधकाम विभागाने दि. २८ मे रोजी अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई केली. सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

या विशेष मोहिमेत सिडको



अतिक्रमण विभागाचे अधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका, पनवेल महानगरपालिका, स्थानिक पोलीस, सिडको पोलीस पथक, महावितरण आणि सिडको सुरक्षा रक्षक तसेच महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे जवान या मोहिमेत सहभागी झाले होते. या कारवाईसाठी ४ जेसीबी, ४ ट्रक, २० जीप आणि ५० कामगारांचा फौजफाटा वापरण्यात आला.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd



CIDCO
WE MAKE CITIES

Friday, 30 May 2025 newsband

# PMC sets up 'coordination cell' to address citizen grievances concerning CIDCO

**Panvel:** In a bid to address the rising number of complaints from residents concerning the City and Industrial Development Corporation (CIDCO), the Panvel Municipal Corporation (PMC) has taken a significant administrative step by establishing a dedicated 'Coordination Cell'.

Mangesh Chitale, civic commissioner, said that residents frequently face challenges linked to civic services and development schemes, including implementation delays, infrastructure deficiencies, and issues surrounding permissions and approvals.

Acknowledging the importance of responding promptly to these concerns, Chitale added, "The newly formed Coordination Cell has been tasked with streamlining communication between citizens and municipal authorities. The cell will act swiftly on grievances and coordinate closely with relevant departments to deliver resolutions without delay."

To manage the functioning of the cell effectively, six officers from various departments have been appointed. They are responsible for monitoring complaints received through the cell, ensuring they are followed up appropriately, and coordinating with relevant officials to achieve speedy redressal. The administration has issued clear instructions to all associated staff to treat complaints with urgency and diligence, reinforcing its commitment to responsive governance.

He further emphasised that this move will not only enhance administrative efficiency but also foster greater transparency and accountability in dealings between the public and the municipality. He expressed confidence that the initiative would significantly improve the convenience of citizens and strengthen the relationship between the administration and the community.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd